क्रेडीट कार्डांचा उपयोग

एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ५३, (जून २७, २००२)

भारतीय रिझर्व बँक

विनिमय नियंत्रण विभाग

मध्यवर्ती कार्यालय

मुंबई ४००० ००१

एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ५३,

जून २७, २००२

प्रति,

विदेशी चलनाचे सर्व अधिकृत डिलर

महोदया/महोदय,

**अधिकृत डिलर्सचे एपी(डीआयआर मालिका) च्या परिच्छेद ३ कडे लक्ष वेधण्यात येत आहे**

परिपत्रक क्र. १९ दिनांकित ऑक्टोबर ३०, २००० स्पष्टीकरण देणारे कि, संज्ञा "चलन" मध्ये इतर सर्व बाबींबरोबर, क्रेडीट कार्डस, एटीएम कार्डस आणि डेबीट कार्डस वगैरे समाविष्ट आहेत आणि विदेशी विनिमय व्यवस्थापन अधीनियमा अधीन निर्गमित केलेले आदेश आणि बनविलेले नियम आणि नियमने क्रेडीट कार्डस, एटीएम कार्डस आणि डेबीट कार्डसना सुध्दा लागू आहेत.

२. हे स्पष्ट करण्यात येत आहे कि,

(१) आंतरराष्ट्रीय क्रेडीट कार्डे भारतातील अधिकृत डिलरकडून विदेशी चलन खरेदी करता येईल अशा कोणत्याही हेतूसाठी म्हणजेच पुस्तकांची आयात, डाउनलोडेबल सॉफ्यवेअर्सची खरेदी किंवा एक्झीम धोरणांतर्गत आयातीची अनुमति असलेल्या कोणत्याहि खरेदीसाठी इंटरनेटद्वारे वापरता येतील.

(२) आंतरराष्ट्रीय क्रेडीट कार्डे लॉटरी तिकिटे, बंदी घातलेली किंवा प्रतिबांधित मासिके, स्वीपस्टेकस मधील सहभाग, कॉलबॅक सेवांसाठी प्रदाने इत्यादींसाठी इंटरनेटद्वारे वापरता येणार नाहीत कारण अशा बाबी किंवा कामांसाठी विदेशी चलन देण्यास मनाई आहे.

(३) आंतरराष्ट्रीय क्रेडीट कार्डांच्या इंटरनेटद्वारे वापरासाठी वेगळी अशी एकूण मर्यादा विहीत केलेली नाही. त्यापुढे असेहि स्पष्ट करण्यात येत आहे कि डेबीट कार्ड आणि एटिम कार्ड सुध्दा भारतातील अधिकृत डिलरकडून ज्या हेतूसाठी विदेशी चलन खरेदी करता येईल अशा कोणत्याही हेतूसाठी वापरता येतील.

३. अधिकृत डिलरचे रिझर्व बँकेच्या अधिसूचना क्र, १४/२०००-आरबी दिनांकित ३ मे २००० च्या नियम ४ च्या बाब (३) कडेही लक्ष वेधण्यात येत आहे ज्यातील अटीनुसार खरेदीदाराने सही केलेल्या चार्ज स्लिप समक्ष भारतातील क्रेडीट सेवा देणाऱ्या बँकेने स्वीकारलेले प्रदान भारताबाहेरील निर्यातीसाठी प्रदान प्राप्त होण्यास अनुज्ञेय पध्दती आहे. या परवानगीत हे गृहित आहे कि ग्राहकाने जेव्हा तो भारतात येईल तेव्हा प्रदान करण्याचा निर्णय घेतला आहे. आता असे ठरविण्यात आले आहे कि, आयातदार ग्राहक भारतभेटीवर आहे अथवा नाही ही बाब विचारात न घेता भारताबाहेरील निर्यातीसाठी डेबीट किंवा क्रेडीट कार्ड द्वारे प्रदान स्वीकारण्यास अधिकृत डिलरना परवानगी द्यावी.

त्यानुसार हे स्पष्ट करण्यात येत आहे कि ज्या बाबतीत कार्ड देणाऱ्या बँकेकडून/संघटनेकडून विदेशी चलनात प्रतिपूर्ती केली जाणार असेल तर अधिकृत डिलर भारताबाहेर केलेल्या निर्यातीसाठी आयातदाराच्या डेबीट किंवा क्रेडिट कार्डद्वारे प्रदान स्वीकारू शकतो.

४. अधिकृत डिलर त्यांच्या संबंधित घटकांच्या निदर्शनास या परिपत्रकातील बाबी आणू शकतो.

५. या परिपत्रकाद्वारे दिलेले आदेश विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम १९९९ (१९९९ चा ४२) च्या कलम १०(४) आणि कलम १(१) अधीन दिले आहेत.

आपला विश्वासू

ग्रेस कोशी

प्रमुख महाव्यवस्थापक